सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २५४ | शनिवार, दि. ६ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५०६००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३९४००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११५५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २५६०/-
भाव प्रती १० ग्राम

**आजचे अभीष्टचिंतन**



**श्री. किरण पाटील**
सेवेकरी - मंगळग्रह मंदिर

**श्री. भिला पाटील**
(पैलवान) अमळनेर

## सावखेडा वाळू ठेका व अवैध डिझेल प्रकरण

# अमळनेरातील दोन महसूल कर्मचारी निलंबित

## ग्रामस्थांची तक्रार दुर्लक्षितच

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील सावखेडा येथील वाळू ठेका आणि अवैध डिझेल साठा प्रकरणात जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेत मोठी प्रशासकीय कारवाई केली आहे. या प्रकरणी जबाबदारी निश्चित करत अमळनेर तालुक्यातील मंडळ अधिकारी कल्याणी पाटील व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पवनकुमार शिंगारे असे दोन महसूल कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्यामार्फत जारी करण्यात आले आहे.

सावखेडा परिसरातील वाळू ठेक्याच्या कामकाजादरम्यान नियमभंग, देखरेखीतील त्रुटी तसेच अवैध डिझेल साठ्याबाबत गंभीर बाबी निदर्शनास आल्यानंतर प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे. चौकशीदरम्यान महसूल विभागाच्या स्थानिक पातळीवरील नियंत्रण आणि देखरेखीबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

विशेष म्हणजे, या प्रकरणातील कारवाई केवळ कनिष्ठ अधिकाऱ्यांपुरती मर्यादित राहणार नसल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे. सावखेडा प्रकरणात पुढे आणखी काही अधिकारी, कर्मचारी किंवा संबंधित ठेकेदारांवर कारवाई होणार का, तसेच आढळून आलेला अवैध डिझेल व वाळू साठा त्याचे पुढे काय होईल याकडे आता संपूर्ण तालूक्याचे लक्ष लागले आहे.

> नदी पात्रातील वाळू प्रकरणी नुकतीच दोन अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. नदीपात्रात आढळलेल्या डिझेल साठ्याबाबतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा डिझेल साठा कुठून आला, कोणाच्या सांगण्यावरून आणण्यात आला, हा पोलीस कार्यवाही तपासाचा भाग असून, याबाबत सखोल चौकशी करून पोलीस आवश्यक ती कारवाई करतील.
>
> **– रुपेशकुमार सुराणा, तहसीलदार**

> सावखेडा नदीपात्रात नुकत्याच झालेल्या अवैध वाळू उत्खनन प्रकरणात तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी (सर्कल) या दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच नदीपात्रात आढळून आलेल्या डिझेल साठ्याबाबत हे डिझेल कुठून आणण्यात आले अथवा त्याचा पुरवठा कशाप्रकारे करण्यात आला, याची सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> **–मयूर भंगाळे, प्रांताधिकारी**

> डिझेल साठ्याप्रकरणी पीएसआय शिरसाट तपास करीत आहेत. नदीपात्रात टँकरद्वारे डिझेलचा पुरवठा होत असल्याचे अद्याप तपासात निष्पन्न झालेले नाही. नदीपात्रात सुमारे १,५२० लिटर क्षमतेचे डिझेलचे बॅरल आढळून आले आहेत. याबाबत टँकरद्वारे पुरवठा झाल्याचे कोणतेही पुरावे अद्याप समोर आलेले नाहीत. तसेच या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.
>
> **–दत्तात्रय निकम, पोलीस निरीक्षक**

**प्रत्यक्षदर्शी खोटारडे आहेत काय?**

नदीपात्रात डंपर, पोकलँड व जेसीबी यांना मोठ्या प्रमाणावर डिझेल लागत होते. सदर वाहनांना डिझेल पुरवठा करण्यासाठी पूर्ण भरलेला टँकर नदीपात्रात अनेकदा आला होता. ते पंचकोशीतील ग्रामस्थांनी वारंवार उघड्या डोळ्यांनी पाहीले आहे. त्यांना शेतीसाठी डिझेल मिळत नव्हते. मात्र अवैध उत्खननासाठी संपूर्ण टँकर नदी पात्रात येत होता. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप होता व आहे. पोलीसांच्या मते टँकर नदीपात्रात येत होता याचा पुरावा नाही. याचाच अर्थ ज्या ग्रामस्थांनी उघड्या डोळ्यांनी अनेकदा टँकर पाहिला ते पोलीसांच्या मते सारेच खोटारडे ठरले आहेत. यामुळे देखील ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट आहे. सदर प्रकरणी ग्रामस्थ वरीष्ठांकडे पुन्हा तक्रारी करणार असल्याचे समजते.



पाळधी ता. धरणगाव : जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. भाऊसो. गुलाबरावजी पाटील यांचा शुक्रवार दि. ५ जून रोजी वाढदिवसानिमित्त यथोचित सन्मानावेळी शालेय विद्यार्थांसाठी वह्या देवून शुभेच्छा देताना मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहीरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त डी. ए. सोनवणे व जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी.

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा आज शिवसंवाद दौरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार राज्यभर विधानसभा निहाय "शिवसंवाद दौरा" आयोजित करण्यात येत असून, शिवसेना संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जळगाव जिल्ह्याचा दौरा शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता अमळनेर येथे आयोजित करण्यात आला आहे.



अमळनेर येथील हॉटेल मिडटाऊन येथे अमळनेर, जळगाव ग्रामीण व चोपडा या तीन विधानसभा मतदारसंघांचा संयुक्त शिवसंवाद कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. श्री. गुलाबरावजी पाटील, शालेय शिक्षण मंत्री ना. श्री. दादाजी भुसे, शिवसेना संपर्कमंत्री धुळे श्री. भाऊसाहेब चौधरी, विभागीय सचिव श्री. आनंद परांजपे, माजी खासदार व जळगाव संपर्कप्रमुख आ. श्री. दिलीप मामा लांडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आजी-माजी खासदार, आमदार, जिल्हाप्रमुख व विविध आघाड्यांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

शिवसंवाद दौऱ्यामध्ये संबंधित विधानसभा मतदारसंघांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार असून शिवसैनिकांशी थेट संवाद साधला जाणार आहे.

मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे, संघटनात्मक कार्य करताना येणाऱ्या अडचणी तसेच आगामी काळातील संघटन बळकटीकरणाबाबत चर्चा करून विविध प्रश्नांवर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.तरी अमळनेर तालुक्यातील सर्व नगरसेवक, नगरसेविका, आजी-माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, शाखाप्रमुख, बूथप्रमुख तसेच शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख श्री. गुलाब पाटील यांनी केले आहे.

**दिनविशेष**
६ जून

- रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.
- गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सची स्थापना.
- भारतीय टेनिस जोडी लिएंडर पेस आणि महेश भूपती यांनी ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावले.

**बारामती बसस्थानक राज्यात अव्वल; मिळविले एक कोटीचे पारितोषिक**

पान २ वर...

# अवैध दारू धंद्यांचे कंबरडे मोडले!

## पोलीस निरीक्षक आणि दारूबंदी पथकाकडून हातभट्ट्या उद्ध्वस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : डीवायएसपी विनायक कोते आणि पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या पथकानी तालुक्यात गावठी दारूच्या हातभट्ट्यांवर धाडी टाकून सुमारे दोन लाख रुपयांची दारू व रसायन जप्त करून आठ हातभट्या उध्वस्त केल्या आहेत. पोलिसांच्या धडक कारवाईमुळे गावठी दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे. त्याचप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे देखील जिल्ह्यात विविध ठिकाणी छापे मारण्यात आले.

तालुक्यातील हिंगोणे सिम येथे गावठी दारूच्या हातभट्ट्या सुरू असल्याची माहिती डीवायएसपी विनायक कोते याना ३ रोजी मिळाली. त्यांनी पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज ,पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे , मुकेश साळुंखे , भरत ईशी , मिलिंद सोनार , लक्ष्मीकांत शिंपी , हितेश बेहरे , उज्वल पाटील यांना सोबत घेऊन रात्री साडे नऊ वाजेच्या सुमारास हिंगोणे सिम येथे छापा टाकला असता नवल रोहिदास कोळी यांच्या शेताजवळील गावठाण जागेत काटेरी झुडुपात गावठी दारूच्या चार भट्ट्या सुरू असल्याच्या दिसून आल्या. त्या सोपान गुलाब कोळी याच्या असल्याचे समजले.

(पान २ वर...)



अमळनेर : हिंगोणे सिम येथे गावठी दारू जप्त करुन मद्यसाठा नष्ट करताना दारुबंदी पथक व पोलीस कर्मचारी




# श्री विष्णू पंचायतन यागाची उद्या सांगता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात 'पंचदिन साध्य विष्णू पंचायत याग' आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम बुधवार, दिनांक ३ जून रोजी सकाळी ९ वाजता संकष्टी चतुर्थीच्या पवित्र पर्वावर सुरू झाला. दि. ७ रोजी सांगता होणार आहे.आज दि.५ रोजी सकल देवता प्रातः पूजन करण्यात आले.

या यागाचे मुख्य यजमान म्हणून अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष तथा समाजकार्य फाउंडेशनचे मुख्य यजमान डॉ. सुप्रीम पाटील यांनी सहकुटुंब पूजा-अर्चा केली. त्यांच्यासह श्री.राजेंद्र जोशी गुरुजी आणि श्री.देवाभाऊ लांडगे हे देखील यजमान म्हणून सपत्नीक उपस्थित होते.कार्यक्रमात गणेश पीठ व यंत्र देवता सथापन करून १०० गणेश अथर्व शीर्ष पाठाचे अभिषेक, १ हजार दुर्वा अर्चन, माध्यिन पूजन, हवन विशेष आहुती १ हजार मोदक, सायंकाळी पूजन, संगीतमय अधिक मास महात्म्य कथा श्रवण आणि आरती ने तिसऱ्या दिवसाची सांगता झाली. आशियास्टार आयकॉन अवॉर्ड प्राप्त, अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे, जळगाव जिल्हाध्यक्ष तसेच समाजकार्य फाऊंडेशन, अमळनेरचे तालुकाध्यक्ष डॉ. सुप्रीम संजय पाटील हे प्रमुख यजमान आहेत.

रोज दुपारी ४ ते सायं. ६ वाजे दरम्यान अधिक मास महात्म्य कथेचे निरूपण होत आहे.

(पान २ वर...)



## संपादकीय

# उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या स्वप्नांचा 'मागोवा'

'माणूस हा त्याच्या विचारांचा प्रॉडक्ट (उत्पादन) असतो; तो जसा विचार करतो, तसाच तो बनतो,' राष्ट्रपिता महात्मा गांधींचे हे विचार आजच्या २१ व्या शतकातील स्पर्धात्मक आणि वेगवान युगात अधिक प्रासंगिक वाटू लागले आहेत. मानवी जीवनाचा इतिहास साक्षी आहे की, जगात ज्या काही क्रांत्या झाल्या किंवा जे काही मोठे शोध लागले, त्या सर्वांची सुरुवात एका छोट्याशा विचारातून झाली होती. विचार ही एक अशी उर्जा आहे जी माणसाला निव्वळ जिवंत राहण्यापलीकडे जाऊन काहीतरी भव्य-दिव्य करण्याची प्रेरणा देते. म्हणूनच, "जसा विचार तसे लक्ष्य साध्य" हा केवळ एक सुविचार नाही, तर तो यशाचा पायाभूत सिद्धांत आहे.भारताचे माजी राष्ट्रपती आणि महान शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अब्दुल कलाम नेहमी सांगायचे, "स्वप्न ती नसतात जी तुम्ही झोपेत पाहता, स्वप्न ती असतात जी तुम्हाला झोपू देत नाहीत." झोपेत पडणारी स्वप्ने ही बहुतांश वेळा काल्पनिक आणि आपल्या नियंत्रणाबाहेरची असतात.

मात्र, उघड्या डोळ्यांनी पाहिलेली स्वप्ने ही जाणीवपूर्वक, ध्येयाने प्रेरित आणि डोळस असतात.उघड्या डोळ्यांनी स्वप्न पाहणे म्हणजे स्वतःच्या क्षमतांची जाणीव ठेवून, भविष्यातील ध्येयाचे चित्र मनाच्या पडद्यावर स्पष्टपणे रेखाटणे होय. जेव्हा आपण उघड्या डोळ्यांनी एखादे ध्येय पाहतो, तेव्हा आपला मेंदू ते साध्य करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मार्गांचा शोध घेऊ लागतो. ही स्वप्ने आपल्याला सुखासीनतेच्या बाहेर पडण्यास भाग पाडतात.केवळ भव्य स्वप्ने पाहिल्याने किंवा सकारात्मक विचार केल्याने ध्येय साध्य होत नाही. विचारांना जर कृतीची जोड मिळाली नाही, तर ते विचार म्हणजे केवळ 'दिवास्वप्न' ठरतात. विचारांचे रुपांतर वास्तवात करण्यासाठी 'प्रयत्न' अत्यंत महत्त्वाचे आहेत."उद्योगेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।" अर्थात, कोणतीही कार्ये केवळ इच्छेने नव्हे, तर कठोर परिश्रमाने आणि प्रयत्नानेच सिद्धीस जातात.प्रयत्न हे सातत्यपूर्ण असावे लागतात. अनेकदा पहिल्या किंवा दुसऱ्या प्रयत्नात अपयश आल्यावर माणूस खचून जातो. पण अपयश म्हणजे प्रयत्नांचा अंत नव्हे, तर ती मार्ग सुधारण्याची एक संधी असते. थॉमस एडिसनने विजेचा दिवा शोधण्यापूर्वी हजारो अयशस्वी प्रयत्न केले. जर त्यांनी प्रयत्न सोडले असते, तर जग अंधारातच राहिले असते. त्यामुळे, विचारांच्या बळावर ठरवलेल्या लक्ष्याकडे पोहोचण्यासाठी अविरत आणि प्रामाणिक प्रयत्न करणे हे प्रत्येक यशस्वाची पहिली पायरी असते.ध्येय निश्चित झाले, प्रयत्नही सुरू झाले; पण आपण योग्य दिशेने जात आहोत की नाही, हे कसे कळणार? यासाठी अत्यंत आवश्यक असतो'सतत मागोवा'.आपल्या प्रयत्नांचे वेळोवेळी आत्मपरीक्षण करणे, कुठे चुका होत आहेत हे शोधणे आणि त्यानुसार स्वतःमध्ये बदल करणे यालाच 'मागोवा घेणे' म्हणतात. आधुनिक व्यवस्थापनात याला 'फीडबॅक लूप' म्हटले जाते.

जर आपण आपल्या प्रवासाचा मागोवा घेतला नाही, तर आपण भरकटण्याची शक्यता जास्त असते. जसा जहाजाचा कॅप्टन वादळातही दिशा भरकटू नये म्हणून होकायंत्राचा सतत मागोवा घेतो, तसेच आपल्यालाही आपल्या दैनंदिन, साप्ताहिक किंवा मासिक प्रगतीचा आढावा घ्यावा लागतो. सततच्या मागोव्यामुळे आपल्याला आपल्या उणिवा समजतात आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते.विचार, प्रयत्न आणि मागोवा यांचा त्रिवेणी संगम,जेव्हा उच्च विचार, कठोर प्रयत्न आणि अचूक मागोवा या तीन गोष्टी एकत्र येतात, तेव्हा 'लक्ष्य साध्य' होणे ही केवळ काळाची बाब उरते.सकारात्मक विचार आपल्याला दिशा दाखवतो आणि ऊर्जा देतो.अविरत प्रयत्न आपल्याला त्या दिशेने पुढे घेऊन जातात.सततचा मागोवा आपण मार्ग भरकटणार नाही याची खात्री करतो.आजच्या तरुणाईला याची सर्वात जास्त गरज आहे. आजूबाजूला असणारी प्रलोभने आणि तात्कालिक यशाची ओढ यांमुळे अनेकदा ध्येयावरून लक्ष विचलित होते. अशा वेळी स्वतःच्या विचारांवर ताबा मिळवणे आणि उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या स्वप्नांवर ठाम राहणे गरजेचे आहे.थोडक्यात सांगायचे तर, यश ही काही एका रात्रीत घडणारी चमत्कारिक घटना नाही. ती एक पद्धतशीर प्रक्रिया आहे. या प्रक्रियेची सुरुवात तुमच्या डोक्यात येणाऱ्या विचाराने होते. तुमचे विचार जितके शुद्ध, उदात्त आणि स्पष्ट असतील, तितके तुमचे लक्ष्य तुमच्या जवळ येईल.

# तुमच्या 'या' सवयींमुळे खराब होते कार एसी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



९०% लोक रोज करतात या चुका उन्हाळ्यामध्ये कारचा प्रवास हा एसी असल्याशिवाय आरामदायक होत नाही. बाहेर कितीही उष्ण वातावरण असले तरही कारमध्ये प्रवास करताना एसी ऑन असेल तर गारेगार वाटते. पण अनेकदा लोक तक्रार करतात की, एसी पहिल्यासारखा गारवा देत नाहीये.

दरवेळी यामुळे गॅस लीकेज किंवा कंप्रेसर खराब होत नाही. अनेकदा आपण अशा काही चुका करत असतो, ज्यामुळे एसीचा परफॉर्मेंस खराब होतो आणि सिस्टमवर अतिरिक्त दबाव पडतो.

**एसी चालू करुन खिडकी ओपन करणे पडू शकते महागात :**

अनेक लोक कारमध्ये बसताच एसी ऑन करतात. पण खिडक्या बंद करणे विसरतात. यामुळे बाहेरची गरम हवा सतत केबिनमध्ये येते आणि एसीला जास्त मेहनत करावी लागते. सतत अतिरिक्त लोड दिल्याने कंप्रेसर लवकर गरम होतं. ज्यामुळे त्याची लाइफ कमी होते आणि मायलेजवरही परिणाम होतो.

**इंजिन बंद करण्यापूर्वी एसी बंद करणे गरजेचे :**

प्रवास संपताच थेट इंजिन बंद करणे एसीच्या सिस्टमसाठी योग्य मानले जाते. तुम्ही एसी चालू असताना इंजिन बंद केले. तर पुढच्या वेळी स्टार्ट करताना इंजिनवर अतिरिक्त दबाव पडू शकतो. यासोबतच पाइपमध्ये ओलोवा जमा होतो. ज्यामुळे बॅक्टेरिया, फंगस आणि दुर्गंधीची समस्या वाढू शकते. गाडी थांबवण्याच्या २-३ मिनिटांपूर्वीच एसी बंद करा आणि फक्त ब्लोअर चालू द्या.

**कारमधील घाणही एसीसाठी हानिकारक :**

कारच्या केबिनमध्ये जमा धूळ आणि कचरा थेट एसी फिल्टरपर्यंत पोहोचतो. एसीच्या माध्यमातून हवा रिसर्कुलेट होते आणि धूळ फिल्टरमध्ये अडकू लागते. वेळेसह फिल्टर चोक होतो. ज्यामुळे कूलिंग कमी होते आणि एसीमधून असामान्य आवाज येतो. यामुळे कारच्या इंटीरियरची स्वच्छता खुप गरजेची आहे.

**चुकीचा परफ्यूम एसीला नुकसान पोहोचवू शकतो :**

जेल किंवा व्हॅक्स बेस्ड कार परफ्यूम एसी सिस्टमसाठी हानिकारक ठरू शकतो. उन्हाळ्यात यातून निघणारे कण एसीच्या गार हवेच्या संपर्कात येऊन फिल्टर आणि वेंट्समध्ये जमा होतात. यामुळे एयर फ्लोवर परिणाम होतो. कूलिंग क्षमता घटते. विशेषज्ञ चांगल्या क्वालिटीचे लिक्विड किंवा स्प्रे परफ्यूम वापरण्याचा सल्ला देतात.

**कारच्या आत स्मोकिंगमुळे वाढतात अडचणी :**

ड्रायव्हिंग दरम्यान सिगारेट ओढल्याने शरीराला नुकसान होतेच, यासह एसीसाठीही हानिकारक असते. धूरात उपलब्ध टार आणि राखेचे कण एयर फिल्टरमध्ये जमा होऊन त्याला लवकर ब्लॉक करतात. यानंतर एसीच्या कूलिंगवर परिणाम होतो आणि कारच्या आत सिगारेटची दुर्गंधी दीर्घकाळ टिकून राहते. लहान-लहान सवयी बदलल्याने एसीची लाइफ, कूलिंग आणि कारचा परफॉर्मेंस चांगला होतो.

# अमळगाव ग्रामीण रुग्णालय सनियंत्रण समिती स्थापन

## सामाजिक कार्यकर्ते निलेश महाले पाटील यांची सदस्यपदी निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेरः-ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने अमळगाव ग्रामीण रुग्णालयासाठी नव्याने सनियंत्रण व व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली आहे. या समितीवर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अमळगाव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य निलेश लक्ष्मण महाले पाटील यांची सामाजिक कार्यकर्ता पुरुष प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही समिती स्थापन करण्यात आली आहे. रुग्णालयाच्या कामकाजावर देखरेख, रुग्णांना चांगल्या सुविधा, आरोग्य उपक्रमांना गती आणि स्थानिकांचा सहभाग वाढवणे हे समितीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**समितीची रचनाः**

**अध्यक्षः-** राज्याचे माजी मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा अमळनेरचे आमदार अनिलदादा पाटील,

**सदस्यः-** पंचायत राज संस्थांचे २ प्रशासक, एनजीओ प्रतिनिधी संजय कावडे, महिला सामाजिक कार्यकर्ता सौ. पूनम राहुल पवार, निलेश लक्ष्मण महाले पाटील

**पदसिद्ध सदस्यः-** जिल्हा शल्य चिकित्सक जळगाव, गट विकास अधिकारी अमळनेर, उप अभियंता बांधकाम विभाग, पशुसंवर्धन अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी

**सदस्य सचिवः-** वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय अमळगाव

निलेश महाले पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सहकार व जनहिताच्या कामात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांच्या लोकसंपर्काचा आणि अनुभवाचा लाभ रुग्णालयाच्या वैद्यकीय सेवा, स्वच्छता, औषध उपलब्धता, माता-बाल संगोपन, रोगप्रतिबंधक कार्यक्रम व विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीसाठी होणार आहे.निवडीबद्दल आमदार अनिलदादा पाटील, सौ. जयश्रीताई पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शहराध्यक्ष चेतन राजपूत, बाजार समितीचे सभापती अशोक पाटील,बाजार समितीचे संचालक सचिन बाळू पाटील,शेतकी संघ संचालक गणेश भामरे यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त वामन नगरच्या ऑक्सिजन पार्कमध्ये वृक्षारोपण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विप्रो फॅक्टरी अमळनेर आणि आधार संस्था अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने वामन नगर येथील मियावाकी ऑक्सिजन पार्कमध्ये वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

पर्यावरण संवर्धनाला चालना देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विविध प्रजातींच्या १० झाडांचे रोपण करण्यात आले. शहरातील हरितपट्टा वाढवून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी विप्रो केअरतर्फे सेफ्टी ऑफिसर किशोर गुरव, क्वालिटी ऑफिसर दर्शन चौधरी, अकाउंट्स ऑफिसर संदीप मोरे, परचेस ऑफिसर प्रशांत सैंदाणे आणि वेल्फेअर ऑफिसर सुधीर बडगुजर यांनी सहभाग घेतला. तसेच आधार संस्थेचे प्रतिनिधी राकेश महाजन आणि अश्विनी भदाणे हेही उपस्थित होते.

वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याची गरज असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता पर्यावरण रक्षणाच्या सामूहिक संकल्पाने करण्यात आली.



**अमळनेर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्तभारतीय जनता पक्षातर्फे वृक्षारोपण कार्यक्रमाचे श्री.मंगळग्रह मंदिर परिसरात, शुक्रवार दि ५ जून रोजी सकाळी आयोजन करण्यात आले. याप्रसंगी भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे पश्चिम जिल्हाध्यक्ष सुरेश बाविस्कर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष लालचंद सैनानी, सरचिटणीस भरत परदेशी, भटक्या जाती-जमाती जिल्हा उपाध्यक्ष दीपक भोई, नगरसेवक बाळू पाटील, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र लांडगे, संजय पाटील, यांच्यासह मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त डी. ए. सोनवणे आदी. (छायाचित्र : मयूर चौधरी)**

# साने गुरुजी स्मारक रस्त्यासाठी लोकसहभागातून श्रमदान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान, अमळनेरतर्फे स्मारकाला जोडणाऱ्या सुमारे एक किलोमीटर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लोकसहभागातून श्रमदान उपक्रम हाती घेण्यात आला आहे. साने गुरुजी स्मृतीदिनानिमित्त ११ जून रोजी सामूहिक श्रमदानातून हा रस्ता तयार करण्यात येणार आहे.

स्मारकाला जोडणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने शेतकरी बांधवांना बैलगाडी व ट्रॅक्टर घेऊन शेतात जाणे कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने अपघात व जीवितहानीची शक्यता निर्माण झाली आहे. लहान मुले, महिला, शेतकरी तसेच पर्यटकांसाठी हा रस्ता रोजच्या वापराचा असल्याने तातडीने दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे प्रतिष्ठानतर्फे सांगण्यात आले.

"चला श्रमदानातून लोकसहभागातून निर्माण करू रस्ता" या घोषवाक्याखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. रस्ता दुरुस्तीसाठी मार्गदर्शन, ट्रॅक्टर, जेसीबी, श्रमदान व प्रेरणा यांची गरज असल्याचे प्रतिष्ठानने स्पष्ट केले आहे. पर्यावरण संवर्धनासह शेतकरी बांधवांच्या सोयीसाठी हा रस्ता निर्माण करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही सांगण्यात आले. अधिक माहितीसाठी साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान, अमळनेर यांच्याशी ९०७५५७०५१० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अवैध दारू धंद्यांचे कंबरडे मोडले!

पान १ वरुन...

पोलिसांनी चारही भट्टीवरील २४ हजार रुपये किमतीचे २०० लिटरचे चार ड्रम मधील ८०० लिटर उकळते रसायन आणि १४ ड्रम मधील ८४ हजार रुपयांचे २८०० लिटर गूळ नवसागर मिश्रित कच्चे रसायन आणि ५ हजार रुपयांची १०० लिटर पक्की दारू असे सुमारे १ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जागेवरच नष्ट करून भट्ट्या उध्वस्त केल्या. त्याचप्रमाणे मंगळ ग्रह मंदिरासमोर मोकळ्या जागेत मयूर देवसिंग पवार रा. कृष्णा पेट्रोलपंप समोर चोपडा रोड हा गावठी दारू विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून ५ हजार रुपयांची दारू व कच्चे रसायन जप्त करण्यात आले. हितेश बेहरे यांच्या फिर्यादीवरून कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. जळोद येथे छापा टाकून आबा कोळी याची गावठी दारूची हात भट्टी उध्वस्त करून तेथील ६० हजार रुपये किमतीचे १२ ड्रम मधील ६०० लिटर रसायन व गावठी दारू बनवण्याचे साहित्य नष्ट करण्यात आले. आबा कोळी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याच प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड , हेडकॉन्स्टेबल चंद्रकांत पाटील, प्रशांत पाटील, नितीन कापडणे यानी मच्छी बाजार मध्ये छापा टाकून दिलीप दामोदर पाटील रा तांबेपुरा हनुमान मंदिराच्या मागे याला गावठी दारू विकताना पकडले. त्याच्याजवळून दोन हजार रूपयांची दारू जप्त करण्यात आली. तसेच ३ रोजी सायंकाळी ७ वाजून ५० मिनिटांनी चांदणी कुऱ्हे येथे चिखली नदीच्या काठी भिका अण्णाराव शिंदे हा दारूची भट्टीवर दारू गाळत असताना आढळून आला. १० हजार रुपयांचे गुळमिश्रित रसायन नष्ट करून दारूचा नमुना जप्त करण्यात आला. अमळनेर पोलीस स्टेशनला ६५(फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पळासदळे येथे सजन अर्जुन भिल हा गावाबाहेर काटेरी झुडुपात दारूच्या भट्टीवर पत्र्याच्या ड्रम मध्ये रसायन ढवळताना आढळून आला. पोलिसांनी १२ हजार रुपये किमतीचे २४० लिटर गूळ मिश्रित रसायन नष्ट केले. या सर्व कारवाया पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, उपनिरीक्षक कविता ठाणगे, लक्ष्मीकांत शिंपी, विनोद सोनवणे, विनोद संदानशीव, राजेंद्र देशमाने, मिलिंद सोनार, सुनील तेली यांनी केल्या आहेत.



# श्री विष्णू पंचायतन यागाची उद्या सांगता

पान १ वरुन...

तसेच, अधिकमास महात्म्य कथा आणि विविध पूजा-अर्चा करण्यात आल्या.अधिकमासात भगवान विष्णू आणि महालक्ष्मी यांच्या कृपेसाठी आणि नवग्रहांच्या पूजेसाठी हा याग केला जातो. या यागामुळे घरात सुख-शांती लाभते आणि ग्रह दोष निवारण होण्यास मदत होते, अशी मान्यता आहे.अधिकमास महात्म्य कथेचे निवेदक नाशिक निवासी व्यास आचार्य श्री.वे.मू. हरिष कुलकर्णी गुरुजी यांनी आपल्या अमोघ वाणीतून कथा सांगितली.यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे मंगळग्रह मंदिरातील गुरुजी चंद्रकांत जोशी सह सर्व गुरुजी, मंगल सेवेकरी आणि भाविक उपस्थित होते.

### डॉ. सुप्रीम पाटील महाराज यांचे काल्याचे कीर्तन



अधिक मासाचे औचित्य साधून श्री मंगळग्रह मंदिरात सुरू असलेल्या पंचदिन साध्य विष्णू पंचायतन याग व अधिक मास महात्म्य कथेची रविवार, दि. ७ जून रोजी सांगता होणार आहे. याप्रसंगी याच दिवशी सायंकाळी ६.३० ते रात्री ८.३० या वेळेत श्री मंगळग्रह मंदिर परिसरात ह.भ.प. डॉ. सुप्रीम पाटील महाराज (कोंढावळकर) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या कीर्तन श्रवणाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# बारामती बसस्थानक राज्यात अव्वल; मिळविले एक कोटीचे पारितोषिक

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक स्पर्धेत पटकावला प्रथम क्रमांक




**मिस यू दादा...**

बारामती बसस्थानक हा दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा ड्रीम प्रोजेक्ट होता. राज्यातील सर्वांत सुंदर बसस्थानक उभारण्याचा निर्णय घेत अवघ्या दोन वर्षांत बारामतीचे बसस्थानक प्रत्यक्षात उतरवून दाखविण्याची किमया त्यांनी साकारली होती. पहिली वीट रचण्यापासून ते उद्घाटनापर्यंत अजितदादांनी एकहाती या बसस्थानकाची उभारणी केली होती. बारामतीला राज्यातील सर्वांत स्वच्छ व सुंदर बसस्थानकाचा किताब मिळालेला पाहण्यासाठी अजितदादा हवे होते, अशी भावुक प्रतिक्रीया अनेक नेटकऱ्यांनी समाजमाध्यमांवर व्यक्त करत मिस यू दादाच्या पोस्ट टाकल्या.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक स्पर्धेत बारामती बसस्थानकाने 'अ' वर्ग प्रवर्गात राज्यात सर्वाधिक गुण प्राप्त करीत राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. सोमवार, दि. १ जून २०२६ रोजी मुंबईतील कार्यक्रमात बारामतीस प्रथम क्रमांकाने गौरविले गेले. पारितोषिकापोटी बारामती बसस्थानकास एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले गेल्याने या निधीतून आणखी काही सुविधा बारामतीत होऊ शकणार आहेत.

राज्यातील ५६८ बसस्थानकांच्या सर्वेक्षणाअंती बारामतीने राज्यातील सर्वांगसुंदर बसस्थानकाचा किताब पटकावला आहे. प्रत्येकी शंभर गुणांच्या चार सर्वेक्षणांमध्ये बारामतीला ४०० पैकी ३८६ गुण प्राप्त झाले. सर्वच निकषांवर बारामती बसस्थानक उजवे ठरल्याने राज्यातील अव्वल बसस्थानकाचा किताब बारामतीला प्राप्त झाला.

एखाद्या विमानतळाच्या धर्तीवर केलेली उभारणी, प्रवासी व चालक वाहकांच्या परिपूर्ण सुविधा आणि भविष्यातील २५ वर्षांचा विचार करून केलेले नियोजन या सर्वांचा विचार सर्वेक्षण करताना झाला. बारामतीत बाहेरून येणारी प्रत्येक व्यक्ती आवर्जून बारामती बसस्थानक पाहण्यासाठी आजही येते. दिवसाच्या उजेडात आणि रात्री दिव्यांच्या प्रकाशात हे बसस्थानक उजळून निघते. सुमारे ५० कोटी रुपये खर्चून हे बसस्थानक उभारण्यात आले आहे. राज्यात अव्वल क्रमांक प्राप्त करणाऱ्या बारामती बसस्थानकाने पुणे प्रादेशिक विभागातही प्रथम क्रमांक प्राप्त केलेला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# स्ट्रॉने नारळ पाणी पिता? हिरव्या नारळाच्या आत लपलाय मृत्यू?

## डॉ. त्यागींचा 'हा' खुलासा ऐकून सरकेल पायाखालची जमीन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नारळाचे पाणी पिण्यासाठी आपल्यांपैकी बहुतांश जण रस्त्यावरील स्टॉलजवळ गर्दीत उभे राहतो आणि कटाक्षाने सकाळची सुरूवात हेल्दी ड्रिंक पिऊन करण्याचा प्रयत्न करतो. पण स्ट्रॉने नारळाचे पाणी पिताना आपल्याला आतील पाणी नेमके कसे आहे, हे कळत नाही. एकूणच आरोग्याला असलेल्या धोक्यापासून आपण पूर्णतः अनभिज्ञ असतो. डॉ. बी. पी. एस. त्यागी यांनी यासंदर्भात सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करून अतिशय महत्त्वाची माहिती दिली आहे. स्ट्रॉने नारळ पाणी पिणे का धोकादायक ठरू शकते आणि नारळ पाणी पिण्याची योग्य तसेच सुरक्षित पद्धत कोणती, याबाबतही त्यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

**स्ट्रॉने नारळ पाणी पिणे धोकादायक का?**

डॉ. त्यागी यांनी सांगितले, की अनेकदा नारळाच्या पाण्याच्या आत बुरशी (फंगस) असते. डॉ. त्यागी यांनी दोन ग्लासमध्ये नारळाचे पाणी काढून दाखवले. एक ग्लास अगदी स्वच्छ दिसला, तर दुसऱ्या ग्लासमध्ये पांढऱ्या रंगाचे कण दिसले. तुम्हीही नारळाच्या पाण्यात असे पांढरे कण पाहिले असतील. पण हे पांढरे कण नेमके कशाचे असतात आणि ते शरीरासाठी किती हानिकारक असतात, हे तुम्हाला माहीत आहे का? चुकीच्या पद्धतीने साठवलेले किंवा खराब झालेले नारळ पाणी पिण्यामुळे जीवघेणे आणि गंभीर धोके निर्माण होऊ शकतात, या गोष्टीवर व्हिडीओमध्ये भर देण्यात आला आहे.

**रिसर्च गेटच्या संशोधनात नेमके काय म्हटले गेले आहे?**

१) नारळ पाणी : हिरव्या नारळातील एक स्वच्छ द्रव पदार्थ, जो नैसर्गिक हायड्रेशन (शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्याच्या) क्षमतेमुळे, उत्तम चवीमुळे आणि आरोग्यासाठी फायदेशीर मानल्या जाणाऱ्या गुणांमुळे जगभरात लोकप्रिय आहे. हे एक पौष्टिक, कमी कॅलरी असलेले पेय आहे आणि बाजारामध्ये मिळणाऱ्या स्पोर्ट्स् ड्रिंक्सचा एक नैसर्गिक पर्याय म्हणून या पेयाकडे पाहिले जाते.

२) नारळ पाणी व्यवस्थित स्टोअर न करण्याशी संबंधित जोखीम : नारळ पाणी लवकर खराब होणारा द्रव पदार्थ आहे. जर ते व्यवस्थित हाताळले किंवा स्टोअर केले नाही, तर त्यात जंतूंचा प्रादुर्भाव होऊन आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. ते नीट स्टोअर न करणे, विशेषतः खोलीच्या तापमानाला (रूम टेम्परेचर) ठेवल्यास बॅक्टेरिया वाढण्यासाठी अनुकूल वातावरण तयार होते. यामुळे पाणी खराब होऊ शकते आणि अन्नबाधा (फुड पॉयझनिंग) होऊ शकते. नारळ पाणी फ्रिजमध्ये न ठेवता किंवा व्यवस्थित सील न करता दीर्घकाळ स्टोअर केले तर हे धोके अधिक निर्माण होऊ शकतात.

**खराब नारळ पाणी प्यायल्याने जीव जाऊ शकतो का?**

रिसर्च गेटच्या एका संशोधनात नारळाच्या पाण्याशी संबंधित एका जीवघेण्या घटनेची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. या संशोधनात एका घटनेचा उल्लेख करताना लिहिले आहे.

१) नारळ पाणी सामान्यतः एक नैसर्गिक पेय मानले जाते. पण २०१९ मध्ये डेन्मार्क येथे घडलेल्या एका घटनेने ते चुकीच्या पद्धतीने साठवण्यामुळे होणारे गंभीर धोके समोर आले आहेत. ६९ वर्षीय एका व्यक्तीचा नारळ पाणी प्यायल्यानंतर मृत्यू झाला; हे नारळ पाणी साधारण महिनाभर खोलीच्या तापमानाला ठेवण्यात आले होते. नारळ पाणी प्यायल्यानंतर काही वेळातच त्या व्यक्तीला मळमळणे, उलट्या होणे आणि गोंधळल्यासारखे वाटू लागले. ज्यानंतर तो बेशुद्ध पडला. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. जेथे तपासणीअंती त्याच्या मेंदूला गंभीर सूज आल्याचे समजले; अखेर ४८ तासांच्या आत त्याचा 'ब्रेन डेथ' झाला

२) नारळ पाणी व्यवस्थित स्टोअर न करण्याशी संबंधित जोखीम लक्षात घ्यावी. नारळ पाणी लवकर खराब होणारा द्रव पदार्थ आहे. जर ते व्यवस्थित हाताळले किंवा स्टोअर केले नाही, तर त्यात जंतूंचा प्रादुर्भाव होऊन आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. ते नीट स्टोअर न करणे, विशेषतः खोलीच्या तापमानाला (रूम टेम्परेचर) ठेवल्यास बॅक्टेरिया वाढण्यासाठी अनुकूल वातावरण तयार होते. यामुळे पाणी खराब होऊ शकते आणि अन्नबाधा (फुड पॉयझनिंग) होऊ शकते. नारळ पाणी फ्रीजमध्ये न ठेवता किंवा व्यवस्थित सील न करता दीर्घकाळ स्टोअर केले तर हे धोके अधिक निर्माण होऊ शकतात.

**आरोग्यासाठी हानिकारक**

घाण पसरवणारे फंगस, जसे की 'Arthrinium' किंवा 'Aspergillus' हे धोकादायक मायकोटॉक्सिन किंवा न्यूरोटॉक्सिन तयार करू शकतात. दूषित नारळ पाणी प्यायल्याने गंभीर फूड पॉयझनिंग होऊ शकते. हे फंगस फुफ्फुसांपर्यंत पसरू शकतात आणि शरीराला हानी पोहोचवू शकतात. जरी बुरशी किंवा फंगस नारळाच्या एखाद्या छोट्या जागेवरच का असेना, पण त्यातील विषारी घटक वेगाने पाण्यात पसरू शकतात. अशा परिस्थितीत पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही नारळ पाणी पिणार असाल, तेव्हा आधी ते ग्लासमध्ये काढून घ्या आणि स्वच्छ पाणी असल्याचे खात्री पटल्यावरच पाणी प्यावे.

# सकाळच्या नाश्त्यात 'मोड आलेले मूग' खाण्याचे ८ जबरदस्त फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मोड आलेल्या मुगामध्ये कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स आणि प्रोटीन भरपूर असतात. यामुळे शरीराला हळूहळू ऊर्जा मिळते. ज्यामुळे दुपारपर्यंत थकवा जाणवत नाही आणि तुम्ही फ्रेश राहता.

अंकुरण प्रक्रियेमुळे मुगातील फायबरचे प्रमाण वाढते. हे पचन सुधारण्यास मदत करते आणि पोट साफ ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. जर तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास असेल, तर मोड आलेले मूग हा एक उत्तम उपाय आहे. हे नैसर्गिकरित्या पोट साफ करण्यास मदत करतात. अंकुरित केल्यामुळे मुगातील 'अँटी-न्यूट्रिएंट्स' कमी होतात. त्यामुळे हे खाल्ल्याने पोटात गॅस किंवा ब्लोटिंग (पोट फुगणे) होण्याचा त्रास होत नाही. तुम्ही वेट लॉस प्लॅनवर असाल, तर हा एक उत्तम नाश्ता आहे. यात कॅलरी कमी आणि प्रोटीन-फायबर जास्त असल्याने, पोट जास्त वेळ भरलेले राहते. जास्त प्रोटीन आणि फायबरमुळे हे खाल्ल्यानंतर लवकर भूक लागत नाही, परिणामी तुम्ही बाहेरचे अनहेल्दी स्नॅक्स खाणे टाळू शकता. यात विटामिन 'सी' आणि भरपूर अँटी ऑक्सिडंट्स असतात. हे शरीरातील टॉक्सिन्स बाहेर काढून फ्री रेडिकल्सशी लढतात, ज्यामुळे त्वचा चमकदार बनते आणि डाग कमी होतात.






# बिना कोचिंग यूपीएससी क्रैक कर रचा इतिहास

## मिलिट्री मैंन की बेटी अब बनेगी कलेक्टर

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जो मेहनत करना जानते है वे कभी जीवन में कितनी भी बड़ी मुश्किलों हो उनसे हारते नहीं है। सफलता उन्हीं के कदम चूमती है। जो बिना किसी दूसरे के भरोसे खुद तैयारी कर सफलता हासिल करना चाहते है वहीं एक न एक दिन इतिहास रचते है। आज हम ऐसी ही एक मेहनत कशी कहानी बताने जा रहें है वो किसी पहचान की मोहताज नहीं है आयएएस अधिकारी रिया सैनी, जिन्होंने कड़ी मेहनत से यूपीएससी क्रैक किया है ।

रिया सैनी यूपी के मुजफ्फरनगर के टांडा गांव की रहने वाली है, जिन्होंने बिना किसी कोचिंग यूपीएससी में २२ वीं रैंक हासिल की है। उन्हे पहली पोस्टिंग पीएम मोदी के संसदीय क्षेत्र वाराणसी में मिली है। जानकारी के अनुसार रिया के पिता मिलिट्री इंजीनियरिंग सर्विस में डायरेक्टर के पद पर तैनात हैं, जबकि मां प्रीति हाउसवाइफ हैं।



रिया सैनी ने आयएएस अधिकारी बनने के लिए किसी कोचिंग क्लास को जॉइन नहीं किया बल्कि अपने बल बूते पर कड़ी मेहनत की और यूपीएससी क्रैक किया है। रिया सैनी को असफलता का सामना करना पड़ना लेकिन फी भी वो डटी रही और मेहनत करना आई रखा पहले प्रयास में पास ना होने पर फिर से जमकर तैयारी की और दोबारा परीक्षा के लिए एगाम दिया।

दूसरे प्रयास में उन्हें इंडियन रेलवे ट्रैफिक सर्विस (आयआरटीएस) मिली। लेकिन रिया को तो आयएएस बनना था तो वह तीसरी बार २०२४ में परीक्षा में बैठीं।

तीसरे प्रयास में उन्होंने २२ वीं रैंक हासिल कर सफलता पाई थी। ट्रेनिंग कंप्लीट करने के बाद रिया सैनी को वाराणसी में ट्रेनी आयएएस के तौर पर पहली पोस्टिंग मिली है।


रिया ने १०वीं और १२वीं में शानदार नंबर प्राप्त किए, उन्होंने जेपी इंस्टीट्यूट, नोएडा से इलेक्ट्रॉनिक्स एंड कम्युनिकेशन में बीटेक किया और फाइनल ईयर में ही यूपीएससी की तैयारी का फैसला लिया। रिया ने समाजशास्त्र को अपना ऑप्शनल सब्जेक्ट चुना।

# केळी की सफरचंद ?

## मधुमेहींसाठी कोणते फळ अधिक सुरक्षित?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्तातील साखरेची पातळी (ब्लड शुगर) नियंत्रणात ठेवण्यासाठी केळी आणि सफरचंद दोन्ही फळे उपयुक्त असू शकतात. केळी आणि सफरचंद खाण्याचा परिणाम वेगळा असतो. योग्य प्रमाण, पिकलेपणा आणि खाण्याची वेळ महत्त्वाची असते. सफरचंदमध्ये विद्रव्य फायबर असते. त्यामुळे साखर हळूहळू रक्तात जाते. इन्सुलिन प्रतिसाद स्थिर राहतो, भूक कमी लागते.



ब्लड शुगर स्पाईक्स कमी होतात, वजन नियंत्रणात मदत होते, टाईप २ डायबिटीस असलेल्या लोकांना फायदा होऊ शकतो. मधुमेहींनी रिकाम्यापोटी जास्त केळी टाळावीत, सफरचंद तुलनेने सुरक्षित फळ मानले जाते. मधुमेही रुग्णांसाठी केळी पूर्णपणे वाईट नाही. पण प्रमाण आणि पिकलेपणा महत्त्वाचा असतो.

मधुमेही रुग्णांनी दिवसाला एक मध्यम आकाराचे सफरचंद, तर दिवसाला १२ ते १ छोटे केळ खाण्यास हरकत नाही. खूप पिकलेल्या केळ्यांत साखर जास्त असते. त्यामुळे जास्त प्रमाणात खाल्ल्यास शुगर स्पाईक होऊ शकतो. मधुमेही रुग्णांसाठी सफरचंद सामान्यतः अधिक सुरक्षित आणि फायदेशीर असतात.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५
वर्षांचा समृद्ध
अनुभव
असलेले
शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे







# हनुमानजी आणि शनिदेवांची एकत्रित आराधना शनिवारी कशी कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या अधिकमास (पुरुषोत्तम मास) सुरू आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार या पवित्र महिन्यात केल्या जाणाऱ्या उपासनेमुळे दुप्पट फळ मिळते. त्यातही अधिकमासात येणाऱ्या शनिवारी हनुमानजी आणि शनिदेव या दोघांची एकत्रित आराधना करणे अत्यंत शुभ आणि कल्याणकारी मानले जाते.

हनुमानजी हे भगवान विष्णूंचे परम अवतार श्रीरामांचे सेवक आहेत, तर शनिदेव हे हनुमानजींच्या भक्तांवर नेहमी प्रसन्न असतात. त्यामुळे या दिवशी केलेल्या पूजेने शनीच्या साडेसातीचा आणि ढैय्याचा त्रास कमी होऊन जीवनात सुख-समृद्धी येते.

**पूजेची योग्य पद्धत आणि नियम**

**१) हनुमानजींची आराधना**

**(सकाळ किंवा सायंकाळ)**

अधिकमासात हनुमानजींची पूजा केल्याने बळ, बुद्धी आणि सर्व संकटांतून मुक्ती मिळते.

**हनुमान चालिसा पाठ :** शनिवारी सकाळी किंवा सायंकाळी हनुमानजींच्या मंदिरात जाऊन किंवा घरात हनुमानजींच्या मूर्तीसमोर बसून ३ किंवा ७ वेळा हनुमान चालिसा किंवा बजरंग बाणचा पाठ करावा.

**सिंदूर विधी :** हनुमानजींना मोहरीच्या किंवा तिळाच्या तेलात मिक्स केलेला सिंदूर (शेंदूर) अर्पण करावा.

**रुईच्या पानांची माळ :** हनुमानजींना ११ किंवा २१ रुईच्या पानांची माळ करून घालावी. प्रत्येक पानावर चंदनाने 'श्रीराम' लिहावे.

**विशेष नैवेद्य :** हनुमानजींना गूळ-खोबरे किंवा बुंदीच्या लाडवांचा गोड नैवेद्य दाखवावा.

**२) शनिदेवांची आराधना**

**(सूर्योदयानंतर किंवा संध्याकाळी)**

शनिदेवांची पूजा नेहमी सूर्योदयानंतर किंवा सूर्यास्तानंतर (सायंकाळी) करणे उत्तम मानले जाते.

**तेल आणि तीळ अर्पण :** शनिदेवाच्या मूर्तीवर किंवा शिलामूर्तीवर तिळाचे किंवा मोहरीचे तेल अर्पण करावे आणि तेलात थोडे काळे तीळ टाकावेत. (लक्षात ठेवा, शनिदेवाच्या डोळ्यात थेट बघून पूजा करू नये, नेहमी त्यांच्या चरणांकडे बघावे).

**शनी मंत्रांचा जप :** पूजेदरम्यान किंवा पिंपळाच्या झाडाजवळ बसून या मंत्रांचा जप करावा. **'ॐ शं शनैश्चराय नमः'** किंवा **'ॐ प्रां प्रीं प्रौं सः शनैश्चराय नमः'**

पिंपळाच्या झाडाची पूजा : शनिवारी सायंकाळी पिंपळाच्या झाडाजवळ मोहरीच्या तेलाचा दिवा लावावा. झाडाला जल अर्पण करून ७ वेळा परिक्रमा करावी. अधिकमासात पिंपळाच्या झाडामध्ये भगवान विष्णूंचा वास असतो. त्यामुळे या पूजेला दुप्पट महत्त्व प्राप्त होते.

**३) अधिकमासातील शनिवारी काय दान कराल?**

या पवित्र महिन्यात दानाचे महत्त्व खूप जास्त असल्याने शनिवारी खालील वस्तूंचे गरजूंना दान करावे.

- काळे कपडे किंवा काळे घोंगडे (कांबळ).
- मोहरीचे तेल किंवा काळे तीळ.
- लोखंडी वस्तू किंवा छत्री.
- गरजू व्यक्तीला किंवा मजुरांना अन्नदान (शक्यतो उडीदडाळीची खिचडी किंवा तळलेले पदार्थ).

**शनिवारी काय टाळाल?**

**(महत्त्वाचे नियम)**

- या दिवशी घरात किंवा बाहेर कोणाशीही वाद घालू नये, विशेषतः वृद्ध, मजूर किंवा गरीब व्यक्तीचा अपमान करू नये.
- शनिवारी स्वतःसाठी लोखंड, तेल किंवा काळे तीळ खरेदी करू नयेत (दान करण्यासाठी या वस्तू आधीच आणून ठेवाव्यात).
- मांस, मद्य आणि तामसिक आहारापासून पूर्णपणे दूर राहावे.

थोडक्यात सांगायचे तर शनिवारी भगवान विष्णूंचे आणि प्रभू श्रीरामचंद्रांचे नाव घेऊन हनुमान चालिसा वाचावी आणि सायंकाळी पिंपळाच्या झाडापाशी दिवा लावून शनिदेवांची प्रार्थना करावी. यामुळे अधिकमासाचे आणि शनिवारचे दोन्ही पुण्य एकत्र मिळते.

**अधिकमास विशेष**





## आश्चर्यच! हनुमानजींच्या भक्तांवर शनिदेव दया का दाखवितात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण नेहमी पाहतो, की शनिवार जवळ येताच हनुमानजींच्या मंदिरांमध्ये भक्तांची गर्दी होते. काही जण हनुमान चालिसाचे पठण करतात, तर काही जण जीवनातील त्रासांपासून मुक्ती मिळविण्यासाठी उपवास करतात आणि बजरंगबलींचा आश्रय घेतात. असे म्हटले जाते, की शनिदेव खऱ्या हनुमानजींच्या भक्तांना त्रास देत नाहीत. काय आहे यामागील कारण?

हिंदू पौराणिक कथांनुसार हनुमानजींना केवळ शक्तीची देवताच नव्हे, तर तारणहार आणि रक्षक देखील मानले जाते. म्हणूनच जेव्हा जीवनात शनिदोष, साडेसाती किंवा ढैय्या यांचे परिणाम वाढतात तेव्हा लोक हनुमानजींची पूजा करणे हा सर्वांत प्रभावी उपाय मानतात. एका आख्यायिकेनुसार एकदा शनिदेवांना आपल्या अफाट शक्ती आणि प्रभावाचा अहंकार आला होता. त्यांना वाटत होते, की कोणतीही व्यक्ती किंवा ग्रह त्यांच्या प्रभावापासून सुटू शकत नाही.

एका आख्यायिकेनुसार एकदा शनिदेवांना आपल्या अफाट शक्ती आणि प्रभावाचा अहंकार आला होता. त्यांना वाटत होते की कोणतीही व्यक्ती किंवा ग्रह त्यांच्या प्रभावापासून सुटू शकत नाही. याच गर्वाने तो लंकेत पोहोचले जेथे त्यावेळी रावणाचे राज्य होते. रावण स्वतः एक अत्यंत शक्तिशाली आणि अहंकारी राजा मानला जात होता. असे म्हटले जाते, की शनिदेवांनी तेथे आपले सामर्थ्य दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु रावणाने त्यांचा अपमान केला, त्यांना कैद केले आणि उलटे टांगले.

रावणाच्या कैदेत शनिदेवांना खूप काळ दुःख भोगावे लागले. ही घटना या गोष्टीचे प्रतीक मानली जाते, की माणूस कोणीही असो, त्याला नेहमी दुःखच भोगावे लागते. आपल्या शक्तीचा अभिमान बाळगणारे शनिदेवसुद्धा हतबल झाले आणि त्यांना दुःख भोगावे लागले.

याच काळात जेव्हा हनुमानजी माता सीतेच्या शोधात लंकेत गेले तेव्हा त्यांनी शनिदेवांना कैदेत पाहिले. हनुमानजींनी तत्काळ त्यांना रावणाच्या कैदेतून मुक्त केले. हनुमानजींची करुणा आणि शक्ती पाहून त्या क्षणी शनिदेवसुद्धा प्रभावित झाले. मुक्त झाल्यानंतर शनिदेवांना आपली चूक लक्षात आली. त्यांना समजले, की खरी शक्ती अहंकारात नाही, तर नम्रता आणि सेवेत आहे. हनुमानजींच्या महानतेपुढे त्यांचा गर्व नाहीसा झाला आणि हनुमानजींप्रती कृतज्ञ झाले.

आख्यायिकेनुसार शनिदेवांनी हनुमानजींना वचन दिले होते, की जो कोणी भक्त त्यांची खऱ्या मनाने पूजा करेल त्याच्यावरील त्यांचा कठोर प्रभाव कमी होईल. म्हणूनच शनिवारी हनुमान चालिसा, सुंदरकांड यांचे पठण करण्याची आणि तेल अर्पण करण्याची परंपरा प्रचलित आहे. असा विश्वास आहे, की हनुमानजींच्या भक्तीमुळे मानसिक भीती, नकारात्मकता आणि शनिदोषाचे परिणाम नाहीसे होतात.

## हनुमान चालिसाबद्दल काय म्हणाले होते नीम करोली बाबा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नीम करोली बाबा हे आधुनिक भारतातील सर्वात प्रभावशाली संतांपैकी एक आहेत. त्यांचे साधे जीवन, सेवा आणि भक्तीचा संदेश आणि चमत्कारांमुळे ते केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील लाखो लोकांच्या हृदयात स्थान मिळवले. यामुळेच लोकांचा त्याच्यावर अपार विश्वास आहे.

नीम करोली बाबा हे हनुमानाचे अवतार असल्याचे म्हटले जाते. त्यांनी त्यांच्या आयुष्यात हनुमानजींची भक्ती आणि सेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले. बाबांनी देशात अनेक ठिकाणी हनुमान मंदिरे स्थापन केली, त्यापैकी उत्तराखंडमधील कैंची धाम मंदिर सर्वात प्रसिद्ध आहे. बाबांचे अनुयायी मानतात की त्यांना हनुमानजींची ऊर्जा आणि कृपा थेट अनुभवता आली. नैनितालजवळील त्यांच्या कैंची धाम आश्रमात दिवसरात्र लोकांची सतत वर्दळ असते.

नीम करोली बाबांनी हनुमान चालीसाला एक महान मंत्र म्हणून वर्णन केले होते. त्यांनी म्हटले होते की जो व्यक्ती दररोज हनुमान चालीसा पठण करतो, त्याच्या जीवनातील सर्व अडथळे दूर होतात आणि इच्छा पूर्ण होतात.

नीम करोली बाबा यांचे हनुमान चालिसाशी संबंधित विचार.

- हनुमान चालिसा प्रार्थनाच तुमचे नशीब बदलू शकतात.
- हनुमान चालिसाची प्रत्येक ओळ स्वतःमध्ये एक महान मंत्र आहे.
- जो व्यक्ती हनुमान चालिसा पठण करतो तो सर्व संकटांपासून मुक्त होतो.
- दररोज हनुमानजींची पूजा केल्याने जीवनातील सर्व अडथळे दूर होतात.
- हनुमानजींना संकटमोचन म्हणतात, जो दुःख आणि वेदना दूर करतो.

**हनुमान चालिसाची प्रत्येक ओळ एक महामंत्र आहे**

नीम करोली बाबांचे संपूर्ण जीवन चमत्कारांनी भरलेले आहे. त्यांच्या आयुष्यात अशा अनेक घटना घडल्या ज्यात त्यांनी हनुमान चालिसाच्या पठणातून अशक्य गोष्ट शक्य केली. असे म्हटले जाते, की संकटाच्या वेळी बाबांनी हनुमान चालीसा पठण करून आश्चर्यकारक चमत्कार केले, आजारी लोकांना बरे केले आणि नैसर्गिक आपत्तींपासून लोकांचे रक्षण केले. बाबांनी हनुमान चालिसाला अत्यंत शक्तिशाली आणि दिव्य ग्रंथ म्हणून आदर दिला. त्यांचा असा विश्वास होता की हनुमान चालीसाच्या प्रत्येक ओळीत अनंत ऊर्जा आणि चमत्कारिक शक्ती आहे. तो ते फक्त प्रार्थनाग्रंथच नाही तर एक महान मंत्र मानत असे. नीम करोली बाबा म्हणायचे, 'हनुमान चालिसा पठण करा, ती तुमच्या जीवनातील प्रत्येक समस्येचे निराकरण आहे.' त्यांनी म्हटले आहे की हनुमान चालिसा हे केवळ शब्दांचा संग्रह नाही तर देवापर्यंत पोहोचण्याचे एक शक्तिशाली साधन आहे.




# शनिवारी उडदाची खिचडी खाल्ल्याने शनिदेव का प्रसन्न होतात?

## ज्योतिषशास्त्रीय कारणे आणि फायदे जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिवारी खिचडी खाल्ल्याने शनिदेव प्रसन्न होतात, असे मानले जाते. मात्र, काय आहेत यामागील ज्योतिषशास्त्रीय कारणे आणि फायदे ते जाणून घेऊया.



**शनिवारचे नियम**

भारतीय स्वयंपाकघरांमध्ये दररोज वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. परंतु शनिवारी खिचडी बनवण्याची आणि खाण्याची परंपरा विशेषतः प्रमुख आहे. उत्तर भारतापासून दक्षिण भारतापर्यंत शनिवारी खिचडी बनवणे ही एक सामान्य प्रथा मानली जाते. प्रश्न असा आहे, की शनिवार आणि खिचडीचा काय संबंध आहे?

खिचडी हे आरोग्याच्या दृष्टिकोनातून पचण्याजोगे आणि पौष्टिक अन्न मानले जाते. परंतु ज्योतिषशास्त्रात त्याचे महत्त्व आणखी खोलवर आहे. शनिवारी खिचडी खाल्ल्याने किंवा दान केल्याने शनिदेव प्रसन्न होतात आणि त्यांचे अशुभ परिणाम कमी होतात, असे मानले जाते.

**शनिवार आणि शनिदेव यांच्यातील खोल संबंध**

ज्योतिष्यांच्या मते, "शनिवारी सात्विक अन्न खाल्ल्याने किंवा दान केल्याने शनिदेव शांत राहतात." शनिदेवाला न्यायाची देवता मानले जाते आणि त्यांच्या क्रोधापासून वाचण्यासाठी शनिवारी विशेष नियम पाळले जातात. म्हणूनच या दिवशी खिचडी खाण्याची परंपरा चालू आहे.

**उडदाची डाळ (काळी उडद) आणि शनिदेव यांचा संबंध**

शनिदेवाला काळे रंग खूप प्रिय मानले जातात : उडदाची डाळ (काळी उडद) काळ्या रंगाची असते, म्हणूनच ती शनिदेवाशी जोडली जाते. त्यामुळे उडदाची डाळ आणि तांदूळ यांनी बनलेली खिचडी शनिदेवांना विशेष प्रिय मानली जाते. अनेक ज्योतिषी सांगतात, की शनिवारच्या दिवशी उडदाची खिचडी खाल्ल्याने किंवा दान केल्याने शनिदोष, साडेसाती किंवा ढैय्याचे वाईट परिणाम नाहीसे होतात.

**शनी आणि खिचडीचे ज्योतिषशास्त्रीय महत्त्व**

सात्विक आणि साधेपणाचे प्रतीक : खिचडी हे सात्विक, साधे आणि पचायला हलके अन्न आहे. शनिदेव हे न्यायाचे देवता आणि कर्मफल दाता आहेत. ते साधेपणा, संयम आणि मेहनतीचे प्रतीक आहेत. शनिवारी तामसिक (मसालेदार, तिखट, मांसाहारी) अन्न टाळून सात्विक खिचडी खाणे हे संयम आणि विनम्रता दाखवते. ज्यामुळे शनिदेव प्रसन्न होतात, अशी श्रद्धा आहे. ज्योतिषशास्त्रात शनी हा जड, मंद आणि उग्र ग्रह मानला जातो. खिचडी शरीराला ऊर्जा देते आणि पचनसंस्थेचे संतुलन राखते. शनिवारी त्याचे सेवन केल्याने मानसिक ताण, भीती आणि नकारात्मक ऊर्जा कमी होते. खिचडी दान करणे हा शनीला प्रसन्न करण्याचा एक प्रभावी मार्ग मानला जातो.

**अजूनही पाळली जाणारी परंपरा**

शनिवारी स्वयंपाक करण्याची, खाण्याची आणि गरजूंना खायला देण्याची परंपरा अजूनही अनेक कुटुंबांमध्ये आहे. असे मानले जाते, की यामुळे घरात शांती, स्थिरता, आनंद आणि समृद्धी येते. तसेच जीवनातील ग्रहदोष आणि अडथळे देखील दूर होतात. शनिवारी खिचडी (विशेषतः उडदाची डाळ असलेली) खाणे हे फक्त आरोग्यासाठी नाही, तर शनिदेवांची कृपा मिळविण्यासाठी, शनिदोष दूर करण्यासाठी आणि जीवनात स्थिरता-शांती आणण्यासाठी केले जाणारे एक लोकप्रिय आणि श्रद्धेय उपाय आहे.

# कैंची धाम कुठे आहे? हे का प्रसिद्ध आहे?

## इतिहास काय आणि तेथे कसे पोहोचायचे? याबद्दल सविस्तरपणे जाणून घ्या



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कैंची धाम हे प्रसिद्ध संत नीम करोली बाबा यांच्याशी संबंधित एक धार्मिक आणि आध्यात्मिक ठिकाण आहे. हे उत्तराखंडमधील नैनीतालजवळ आहे. जेथे त्यांचा आश्रम आहे. अलीकडे हे भारतातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र मानले जाते.

**कैंची धाम कुठे आहे?**

कैंची धाम हे उत्तराखंडमधील नैनीताल जिल्ह्यात, कुमाऊँ पर्वतरांगांमध्ये स्थित आहे. हे नैनीतालपासून सुमारे १७ किलोमीटर आणि भवालीपासून ९ किलोमीटर अंतरावर, नैनीताल-अल्मोडा मार्गावर आहे. हे आश्रम उत्तरवाहिनी नदीच्या तीरावर, हिरव्यागार जंगलांनी आणि उंच पर्वतांनी वेढलेल्या सुंदर ठिकाणी आहे, जे समुद्रसपाटीपासून सुमारे १४०० मीटर उंचीवर आहे.

**कैंची धाम का प्रसिद्ध आहे?**

कैंची धाम हे श्री नीम करोली बाबा यांच्या आश्रमासाठी आणि हनुमान मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. येथील काही प्रमुख कारणे.

**आध्यात्मिक महत्त्व :** नीम करोली बाबा यांना हनुमानजींचा अवतार मानले जाते. येथे येणारे भक्त त्यांच्या मनोकामना पूर्ण होतात आणि आंतरिक शांती मिळते, अशी श्रद्धा आहे.

**चमत्कार :** कैंची धामशी अनेक चमत्कार जोडले गेले आहेत. उदाहरणार्थ, एका भंडाऱ्यादरम्यान तूप कमी पडले असता, बाबांनी नदीचे पाणी आणण्यास सांगितले, आणि ते पाणी तुपा बदलले, अशी कथा प्रसिद्ध आहे.

**सेलिब्रिटींची भेट :** मार्क झुकरबर्ग (फेसबुकचे संस्थापक) आणि स्टीव्ह जॉब्स (ॲपलचे संस्थापक) यांनी कैंची धामला भेट दिली होती. त्यांनी येथील आशीर्वादाने यश मिळवल्याचे सांगितले, ज्यामुळे याची जागतिक प्रसिद्धी वाढली.

**भंडारा आणि मेळा :** दरवर्षी १५ जून रोजी येथे स्थापना दिवस साजरा केला जातो. ज्यावेळी लाखो भक्त भंडाऱ्यासाठी येतात. या भंडाऱ्यात भोजनाची कमतरता कधीच पडत नाही, अशी मान्यता आहे.

**शांत वातावरण :** हिरवीगार पर्वते, शांत नदी आणि आध्यात्मिक वातावरण यामुळे हे ठिकाण शांती आणि ध्यानासाठी आदर्श आहे.

**कैंची धामचा इतिहास**

कैंची धाम आश्रमाची स्थापना १५ जून १९६४ रोजी श्री नीम करोली बाबा यांनी त्यांचे मित्र पूर्णानंद यांच्या सहाय्याने केली. बाबांचा जन्म उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद जिल्ह्यातील अकबरपूर येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला. वयाच्या १७ या वर्षी त्यांना ईश्वरी ज्ञान प्राप्त झाले. त्यांना हनुमान भक्त आणि चमत्कारिक संत मानले जाते.

कैंची धामचे नाव रस्त्यावरील दोन तीव्र वळणे (कैंचीसारखे) यामुळे पडले, ज्याचा कात्री (कैंची) शी संबंध नाही. नीम करोली बाबांनी १० सप्टेंबर १९७३ रोजी महासमाधी घेतली. त्यांच्या अस्थी येथे स्थापित केल्या गेल्या, आणि १९७४ पासून मंदिराचे मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू झाले. येथे हनुमान मंदिर, प्रभू श्रीरामचंद्र-माता सीता मंदिर, दुर्गा मंदिर आणि बाबांच्या पूजेची पवित्र गुफा आहे.

**कैंची धामला कसे पोहोचायचे?**

कैंची धामला पोहोचण्यासाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत.

**रेल्वे मार्ग :** सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन काठगोदाम आहे, जे कैंची धामपासून ३८ किलोमीटर अंतरावर आहे. दिल्लीहून काठगोदामला अनेक गाड्या (उदा.- रानीखेत एक्स्प्रेस) उपलब्ध आहेत. काठगोदामवरून टॅक्सी किंवा बसने कैंची धामला पोहोचता येते. ज्यासाठी सुमारे १५०-३०० रुपये खर्च येईल.

**बस मार्ग :** नैनीतालहून टॅक्सी किंवा स्थानिक बसने कैंची धामला पोहोचता येते.

**हवाई मार्ग :** जवळचे विमानतळ पंतनगर आहे, जे कैंची धामपासून ७० किमी आहे. येथून टॅक्सी किंवा बस उपलब्ध आहे.

**खासगी वाहन :** नैनीताल आणि तेथून कैंची धामपर्यंत खासगी वाहनाने प्रवास करणे सोयीचे आहे. रस्ता सुंदर आणि चांगला आहे.

**सर्वोत्तम वेळ :** मार्च ते जून आणि सप्टेंबर ते नोव्हेंबर हा कैंची धाम भेटीसाठी उत्तम काळ आहे. कारण यावेळी हवामान सुखद असते. जुलै-ऑगस्ट मध्ये पावसामुळे प्रवास टाळावा.

**राहण्याची व्यवस्था आणि खर्च**

कैंची धाम आश्रमात शयनगृह आणि खासगी खोल्या उपलब्ध आहेत. राहण्याचा खर्च सुमारे २०० रुपये प्रतिदिन आहे. भोजनासाठी नाममात्र खर्च (स्वस्त आणि सात्विक भोजन) लागतो. आश्रमात सकाळी आणि सायंकाळी आरतीमध्ये सहभागी होणे बंधनकारक आहे.

**रोचक तथ्ये**

बाबा नीम करोली यांना कंबल बाबा असेही म्हणतात, कारण ते नेहमी कंबल ओढलेले दिसायचे. भक्त येथे कंबल अर्पण करतात. १५ जून रोजी होणाऱ्या भंडाऱ्यात २ लाखांहून अधिक भक्त सहभागी होतात. आश्रमात टेलिफोन नेटवर्क नाहीत, ज्यामुळे बाह्य जगापासून पूर्ण एकांत मिळतो.

कैंची धामला भेट देण्यापूर्वी मंदिराचे वेळापत्रक (सकाळी ६ ते संध्याकाळी ६) तपासा, कारण हिवाळ्यात आश्रम काही काळ बंद असते. जर तुम्ही आश्रमात राहण्याचा विचार करत असाल, तर आश्रमाच्या नियमांचे पालन करावे लागेल. कैंची धाम हे आध्यात्मिक शांती, हनुमान भक्ती आणि नीम करोली बाबांच्या चमत्कारांसाठी प्रसिद्ध आहे. येथील निसर्गरम्य वातावरण आणि धार्मिक महत्त्व यामुळे हे ठिकाण देश-विदेशातील भक्तांचे आकर्षण आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)